ऊस पिकाखालील क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणावयाच्या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने करण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी मंत्रीमंडळ उप समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक: सुसिंयो-२०१७/प्र.क्र.५८/४अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: १६ नोव्हेंबर, २०१७

वाचा:

१. **शासन निर्णय क्र. सुसिंयो-२०१७/प्र.क्र.५८/४अे, दि. २४ जुलै, २०१७**
२. **शासन पत्र क्र. सुसिंयो-२०१७/प्र.क्र.५८/४अे, दि. १ सप्टेंबर, २०१७ अन्वये निर्गमित केलेले मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील बैठकीचे इतिवृत्त.**
३. **मंत्रीमंडळ सचिवांचे पत्र दि. १ नोव्हेंबर, २०१७.**

प्रस्तावना :

राज्यातील ऊस पिकाखालील क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी संदर्भाधीन अ.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेमध्ये ऊस पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी प्रति हेक्टरी ८५,००० च्या मर्यादेत ५ हेक्टर पर्यंत सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यासाठी नाबार्डकडून ५.५०% दराने कर्ज घेऊन राज्य शिखर बँक व जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ७.२५% दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर व्याजाच्या दायित्वापैकी ४% व्याजाचे दायित्व राज्य शासन व १.२५% व्याजाचे दायित्व साखर कारखाने सोसणार आहेत. शेतकऱ्यांना फक्त २% व्याजाच्या रकमेचा भरणा करावा लागणार आहे.

योजनेची अमंलबजावणी करण्याच्या अनुषंगाने कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतले आहे.

शासन निर्णय:

संदर्भाधीन अ.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील ऊस पिकाखालील क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्याच्या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी पुढील प्रमाणे मंत्रीमंडळ उप-समिती गठीत करण्यात येत आहे:-

(१) मा. मंत्री, सहकार- अध्यक्ष
(२) मा. मंत्री, कृषी- सदस्य.
(३) मा. मंत्री, जलसंपदा- सदस्य.
(४) मा. मंत्री, जलसंधारण- सदस्य.
(५) आयुक्त, साखर- सदस्य सचिव.

२. समितीची कार्यकक्षा :-

(१) योजनेच्या अंमलबजावणीसाठी शेतकऱ्यांकडून कर्जासाठी अर्ज मागविणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे ते प्रत्यक्ष कर्ज वाटप व कर्ज वसुली याबाबतची कार्यपद्धती निश्चित करणे

(२)योजनेची अंमजबजावणी करण्यासाठी कृषी विभाग, सहकार विभाग, जलसंधारण व जलसंपदा विभागाची जबाबदारी निश्चित करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११६१७०९१६२६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dr.Kiran Patil

Digitally signed by Dr.Kiran Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=657661007c4f6885bf8deae62f13606632589e592d8c18ceb9a49bfd30471850, cn=Dr.Kiran Patil
Date: 2017.11.16 17:21:05 +05'30'

(डॉ. किरण पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. मंत्री (कृषी), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. मंत्री (सहकार), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा. मंत्री (जलसंपदा), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा. मंत्री (जलसंधारण), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
७. अ. मु. स. (वित्त), वित्त विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
८. अ. मु. स. (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
९. प्र. स, कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
१०.प्र. स, नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
११.प्र.स. (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२.आयुक्त, साखर, साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३.आयुक्त कृषि , कृषि आयुक्तालय, महाराष्ट राज्य पुणे.
१४.मुख्य महाव्यवस्थापक,नाबार्ड, ५४, वेलस्ली रोड,शिवाजी नगर, पुणे.
१५.संचालक (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे (१० प्रतीसह)
१६.निवड नस्ती.